

।। श्री स्वामी समर्थ ।।

# श्री मूळ पुरूष स्तोत्र

तव अकार उकार मकार । शुन्यात प्रणवकार ॐ
मूळ बीज साक्षात मंत्र । बंधन नसे तसा कदापि ।
मुळ हेची मूळ पुरूष । देखीता बिंदु नयनी ।।धृ।।
विश्व भरला सर्वत्र । सर्व श्रेष्ठ मूळ प्रणवकार पाही पाही
बीजा बीजा पेरीता भूमिवरू । कालांतरे मूळ पकडे तयाला तैसा मूळ-मूळ देखिता ।।१।।
कुलपती हाचि मूळपुरूष । आपुल्या सामर्थ्ये निर्मिले । बेचाळीस पिढ्या कुळाचार ।
तयाचा भारवाही रात्रंदिन । विश्वंभरा त्रिजगदिशा कुलरक्षका ।।
चतुर्थबाहू चतुर्थेश्वरा चतुर्था । सर्व संकट हर्तेश्वरा ।
जगतजीवना कुलाचारा । मायामया मायातीता मायेश्वर सर्व स्वाहाकारा प्रणवाकारा ।।३।।
चराचर अणूरेणू व्यापका । कुलपिता मूळपुरूषा । तव नंदन
तुज आळवी प्रेमभावे । नाम स्मरता तव । रक्षावे नंदना । संसारी अखंड ।।४।।
कर्ता हर्ता विघ्नछेदना । भवभय हारका ।
कुलपालन पालनेश्वरा । सर्वत्र तूची व्यापला ।
अज्ञान तिमीरे मतिमंद । विसर पडे तव ।।५।।
समजावे बुडाला कार्यभाग । मनी धरी अहंकार । तया देस शासन ।
स्मरण तुज करीता । तयाचा ऋणी त्रिकाल ।
तिन्ही काळ आळवी तुजला । धरीशी कृपा छत्र प्रेमभावे ।।६।।
जन्मा येऊन कुलनंदन । विसर पडे कुळाचा बहुत भोग भोगणे ।
आलिया समजावे नशिबी । कुलमूळ पुरूष सर्वसर्वा ।
समस्त कुलरक्षक । मनी स्मरता नित्यनेम ।।७।।
संकट पळे सैरावैरा । अखंड गृहीलक्ष्मी दारिद्रय दोष निर्मुलन ।
आरोग्य लाभे त्रिकाल इच्छित मनकामना प्राप्त । सरस्वती बैसोनी वाचेवरी ।।८।।
अखंड करी साह्य । विद्या देई करी ज्ञानवंत । असंख्य अपराध घालुनी पोटी ।
जैसे शेत बहरे । तैसे मम बहरावे जीवन । शांती लाभो अखंड ।।९।।
संसारी राहुनी भक्ती । अखंड घडावी सेवा । मुखी असावे तव नाम
ॐ जागृत चैतन्याय मूळपुरूषाय नमः स्वाः ।।१०।।
कुलमूळपुरूष जागृत मंत्र । ध्यान करीता त्रिकाल । ऋध्दिसिध्दी तया प्राप्त ।
मनकामना फलप्राप्त । गृह, वाहन, लक्ष्मी नांदे । वंशवेल वाढेल अखंड ।।११।।
मूळपुरूष स्तुतीपाठ । नित्य करीता पठण ।
कृपा करी चैतन्य कुलपती । कल्याण समस्ता करी कुलरक्षका ।
शिवराम अज्ञानी आळवी मूळपुरूषा ।।१२।।
असे हे मूळपुरूषाचे नाम स्तवन । स्मरुनी स्वामी समर्थ नित्य करी पठण ।
लाभुनी सांनिध्य तयांचे । होईल दुःखाचे क्षालन ।
वाहुनी पाट समृद्धीचा । करी सुखाचे पालन ।।१३।।
पौर्णिमा व अमावस्येस स्मरोनी । श्री स्वामी नित्य करीता पठण ।
लाभे आर्शिवाद पितरांचा । करीता मूळ पुरुषाचे हे स्तवन ।।१४।।
वंदोनी सद्गुरुसी । करी जो हा परीपाठ ।
सदा राहती स्वामी सांनिध्ये । सुखाचा साजवी थाट ।।१५।।
श्री मूळपुरूषाऽर्पणमस्तु
शुभं भवतु । शुभं भवतु ।। शुभं भवतु ।।।